ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# मुक्ताई बहुउदद्‌शीय सेवा विकास संस्था - एक अभ्यास

## संशोध

**डॉ. शोभा विजयकुमार कागदे**

**प्राचार्य, अध्यापक महाविद्यालय,**

**अरण्येश्वर, पुणे.**

**सौ. कविता प्रदीप तोटे**

**सहा. प्राध्यापक, अध्यापक महाविद्यालय,**

**वडगाव मावळ.**

---

**सारांश :**

NGO समाजातील गरज लक्षात घेऊन गरजूंच्या प्रगतीसाठी कार्य करतात. विशेष शिक्षणाची गरज असणा-या बालकांसाठी शासन कार्यरत आहे, परंतु NGO मार्फतही विशेष शिक्षणाची गरज असणा-या बालकांसाठी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व आत्मविश्वास निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविले जातात, जेणेकरुन शैक्षणिक प्रवाहात इतर सामान्य बालकांप्रमाणे त्यांना सामावून घेता येईल. अशाच एका बहुउददेशीय संस्थेचा अभ्यास सदर संशोधना व्दारे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रस्तावना :**

‘ पिंडे - पिंडे मतिर्भिन्ना ’ या संस्कृत वचनाचा अर्थ ‘ व्यक्ती तितक्या प्रकृती ’ या म्हणीने व्यक्त होतो. प्रत्येक व्यक्ती दुस-या कोणत्याही व्यक्तीहून भिन्न असते. म्हणजेच मानवसमाज लिंगभेद, वर्णभेद, भाषाभेद, धर्मभेद, मतिभेद, वर्णभेद, भाषाभेद, धर्मभेद, अशी विविधता असलेला आहे. जन्माला

आलेला प्रत्येक बालक एकसारखा नसतो. त्याचे गुणधर्म वेगवेगळे असतात. बालकाचे औपचारिक शिक्षणाचे पहिले पाऊल म्हणजे शाळा. प्रत्येक पालकास आपले बालक सर्वसामान्य बालकांप्रमाणे शिक्षण घेऊन प्रगती साधावी असेच वाटत असते व त्याप्रती पालक जागृकही असतात. वर्गात उपस्थित असलेल्या बालकाच्या सवयी ज्या प्रमाणे सारख्या नसतात त्या प्रमाणेच प्रत्येक बालकाची बुध्दिमत्ता ही एकसारखी नसते. वर्गात अध्ययनाचे कार्य करणारे शिक्षक जरी सर्व बालकांना एकाच पध्दतीने वागवित असले तरी प्रत्येक बालकाची आकलन क्षमता सारखी नसते. ज्या प्रकारे प्रतिभाशाली बालके असतात तसेच काही अपवादात्मक बालकेही असतात. उदा. मतिमंद बालके, कर्णबधिर बालके, वाणीदोष असलेली बालके, भावनिक दोष असलेली बालके, शारीरिक अपंगत्व असणारी बालके, विषमसमायोजित बालके, शैक्षणिक अक्षमता असलेली बालके, इत्यादी.

‘ज्या बालकांचा बुध्दिगुणांक ७० - ९० च्या दरम्यान असतो, ज्या बालकांची अध्ययनाची गती सर्वसामान्यांपेक्षा कमी असते. अध्ययन करण्याची क्षमता असते. मात्र विशिष्ट गोष्टींचे अध्ययन करण्यासाठी वेळ अधिक लागतो. म्हणून यांना ‘ Slow Learner ’ किंवा गतीमंद म्हणतात. गतीमंद बालकांची लक्षणे म्हणजे सर्वसामान्यांच्या तुलनेत कार्यक्षमता कमी असते, एकच गोष्ट पून्हा पून्हा सांगावी लागते, प्रश्नांची निरर्थक उत्तरे देतात, अध्ययनास अधिक वेळ लागतो, सर्वसामान्यांच्या तुलनेत संपादन कमी असते, समजावून घेण्यापेक्षा पाठांतराकडे कल असतो, उपयोजनात्मक प्रश्नांची उत्तरे देता येत नाही, अध्ययनात नेहमी दुस-यांची मदत घेतात, परीक्षेत गुण कमी मिळतात. सामान्य बालकाप्रमाणे शिक्षणाच्या प्रवाहात गतिमंद बालक आपला विकास साध्य करु शकत नाही.

## संशोधनाची गरज :

जन्माला आलेले बाळ जर सामान्य नसेल तर पालकांना आपल्या पाल्यास समजून घेतांना अडचणी येतात. परिस्थिनुसार पालक व शिक्षक यांनी सामान्यपेक्षा वेगळ्या असणा-या बालकास समजून त्यांना योग्य ती वागणूक देणे गरजेचे आहे. ज्या बालकांचा बुध्दिगुणांक ७० ते ९० दरम्यान असतो अशा बालकास आपण गतीमंद बालक असे म्हणतो. परंतु बालक गतीमंद असल्यास त्यावर योग्य तो उपचार होणे गरजेचे आहे.

शाळेचे एकूणच कार्य लक्षात घेता शिक्षक उपलब्ध तासिकेत वर्गातील प्रत्येक बालकाकडे विशेष लक्ष देऊ शकत नाहीत. शिक्षण विदयार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात मैलाचा दगड ठरतो. परंतु विशेष शिक्षणाची गरज असलेल्या बालकास सामान्य बालकाप्रमाणे शिक्षण दिल्यास त्याची प्रगती इतर मुलांप्रमाणे होणे शक्य नाही. अशा बालकांना वेगळ्या प्रकारच्या शिक्षण पध्दतीची गरज असते.

मतिमंद बालके, गतिमंद बालके, अपंग बालके, कर्णबधिर बालके, वाणीदोष, दृष्टिहिन इत्यादी यांच्या गरजा लक्षात घेऊन काही सामाजिक कार्य करणा-या संस्था बालकांच्या विकासासाठी कार्य करतात. विशेष बालकांप्रमाणेच समाजातील दुर्बल व मागासवर्गीय घटकांना जीवन जगतांना येणा-या समस्यांवरही NGO कार्यरत आहे. अशासकीय संघटना मुख्यत्वे सामाजिक बांधिलकी जपणारे असतात. समाजाच्या गरजा लक्षात घेऊन संघटना आपले कार्य पुर्णत्वास नेत असतात.

आज भारतात अनेक संघटना प्रभावीपणे आपले कार्य पुर्णत्वास नेताना दिसून येत आहे. याच अनुषंगाने ‘ मुक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्था ’ च्या अभ्यासाद्वारे संस्थेद्वारे राबविण्यात येणा-या गतिमंद मुलांची शाळा व इतर बहुउददेशी कार्य हा अभ्यासाचा विषय आहे. सदर गरज लक्षात घेऊन संशोधकाने अभ्यास करण्याचे निश्चित केले.

## संशोधनाचे महत्त्व :

जी बालके सामान्य नाही म्हणून शिक्षण प्रवाहापासून दूर होताना दिसून येतात त्यांना NGO सारख्या संस्था त्या बालकांच्या गरजेनुसार शिक्षण प्रवाहात आणून त्यांच्यामध्ये शिक्षणाप्रती नवचेतना निर्माण करतात. विशेष गरजा असणा-या बालकांना केवळ शिक्षण प्रवाहात आणणे एवढाच NGO चा उददेश नसतो तर त्या बालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देणे, मनोरंजनपर कार्यक्रमव्दारे जीवनात आनंद निर्माण करुन देणे इत्यादी कार्याच्या माध्यमाने बालकांची प्रगती साध्य करण्याप्रती प्रयत्नशील असतात.

सदर संशोधनामुळे -

१. संस्थेव्दारे गतिमंद बालकांसाठी राबविल्या जाणा-या शाळेविषयी माहिती मिळेल.
२. संस्थेव्दारे राबविल्या जाणा-या सामाजिक कार्याबाबत माहिती मिळेल.

३. संस्थेच्या विविध कार्यक्रमांची माहिती मिळेल.

## संशोधनाचे शीर्षक :

मुक्ताई बहुउदद्देशीय सेवा विकास संस्था - एक अभ्यास

## शीर्षकाचे स्पष्टीकरण :

मुक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थेची स्थापना १९९९ साली करण्यात आली. ही संस्था मिरज, सांगली येथे आहे. सदर संस्थेच्या एकूण तीन शाखा आहेत. ‘ उत्कर्ष गतिमंद मुलांची शाळा ’ या नावाने गतिमंद मुलांसाठी संस्था त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारते. तसेच या संस्थेद्वारे इतर समाजपयोगी कार्य व मागासवर्गीयांसाठी कार्य केले जाते. गतिमंद मुलांसाठी कार्य करणारी सांगली जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे.

## संशोधनाची उदिदष्टे :

१. मुक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थे द्वारे गतिमंद मुलांसाठी राबविण्यात येणा-या कार्यक्रमांचा अभ्यास करणे.
२. मुक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थे मार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहितके :

१. अशासकीय संघटना मानवी विषय व विकासासाठी कार्यरत असतात.
२. अशासकीय संघटना लोकसमुदायाच्या विकासासाठी कार्यरत असतात.
३. गतिमंद मुलांना विशेष शिक्षणाची आवश्यकता असते.

## संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा :

**व्याप्ती -** सदर संशोधन अशासकीय संस्था व अशा प्रकारच्या संस्थां द्वारे विकास झालेल्या व्यक्तिंशी संबंधित आहे.

## मर्यादा -

१. प्रस्तुत संशोधनात लिंग, वय, भावभावना, आवड, मनस्थिती, आर्थिक घटक, इत्यादीवर नियंत्रण ठेवले जाणार नाही.

२. प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष हे संस्थेतील विविध घटकांनी दिलेल्या प्रतिसादाच्या निष्कर्षावर आधारित आहेत.

## परिमर्यादा -

१. प्रस्तुत अभ्यासामध्ये मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थेच्या गतिमंद बालकांच्या शिक्षण विषयक अभ्यासपुरतेच मर्यादित आहे.

२. सदर संशोधन मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थेव्दारे राबविण्यात येणा-या कार्याच्या माहिती पुरतेच मर्यादित आहे.

## संशोधन प्रश्न :

१. मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्था स्थापनेमागील हेतू काय आहे ?

२. मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थेची कार्यवाही कशी चालते व संस्थेला आर्थिक सहाय्य कशाप्रकारे मिळते?

३. मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्था समाजासाठी कोणकोणते सामाजिक व शैक्षणिक कार्य करते ?

## संशोधन पध्दती :

वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील **सर्वेक्षण पध्दती** अंतर्गत **व्यक्ति अभ्यास** या संशोधन पध्दतीचा सदर संशोधनात वापर करण्यात आला.

## संशोधनासाठी माहितीदाते :

सदर संशोधनात मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थेच्या माहिती दात्यांची निवड असंभाव्यतेवर आधारित **सहेतूक** निवड पध्दतीने नमुना निवड करण्यात आली.

## माहिती संकलनाची साधने :

सदर संशोधनामध्ये मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्थेचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत या साधनांचा वापर करण्यात आला.

## माहिती विश्लेषणाची साधने :

सदर संशोधन हे गुणात्मक संशोधन आहे. संकलित माहितीचे गुणात्मक विश्लेषण करण्यात आले.

### संशोधन कार्यपध्दती :

संस्थेची निवड करणे.

↓

संस्थेचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत सूची तयार करणे.

↓

संस्थेच्या पदाधिकारी यांची मुलाखत घेणे.

↓

उपलब्ध माहितीचे अर्थनिर्वचण करणे.

↓

निष्कर्ष काढणे.

## अर्थनिर्वचन :

सदर संशोधनासाठी संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती निलिमा लक्ष्मण कदम यांची मुलाखत घेऊन माहिती मिळविण्यात आली. मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्था गतिमंद मुलांसाठी शिक्षण विषयक कार्य करण्यासाच्या उददेशाने स्थापित करण्यात आली. संस्था बहुउददेशीय कार्य करते. यात आदिवासी पुनर्वसन प्रकल्पा अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण कार्य राबविले जाते. संस्थेमार्फत दर वर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार हा उपक्रम राबविला जातो.

## निष्कर्ष :

१. मूक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्था अशासकीय संस्था आहे. समाजातील उच्च वर्गीय व दानशूर व्यक्तींकडून संस्थेचे आर्थिक कार्य चालविले जाते.

२. संस्थेमार्फत दरवर्षी शालेय मुलांची बुध्दिमत्ता चाचणी घेतली जाते. या चाचणीच्या माध्यमाने गतिमंद मुलांचा शोध घेऊन त्यांना संस्थेच्या शाळेत विशेष शिक्षणासाठी प्रवेश दिला जातो.
३. गतिमंद मुलांना शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात येते. गतिमंद मुलांच्या क्षमतेनुसार विषय ठरविले जातात. मुलांची परिक्षा घेऊन त्यांना पुढील वर्गात प्रवेश दयायचा किंवा नाही हे ठरविले जाते. शिक्षणाबरोबर मुलांना व्यवसाय प्रशिक्षण, कौशल्य संपादन, आत्मविश्वास निर्माण होण्याच्या हेतूने मार्गदर्शन व समूपदेशन करण्यात येते.
४. गतिमंद मुलांची दर तीन महिन्यांनी चाचणी घेण्यात येते यात शारीरिक बदल, रक्त तपासणी, बुध्दिमत्ता चाचणी, भाषिक चाचण्या इत्यादी चा समावेश असतो. गरजेनुसार मुलांना यंत्रसामुग्री व औषधे देण्यात येते.
५. मुले शाळेत आठ तास असतात. या वेळेत मुलांना विषयाचे ज्ञान, मनोरंजन कार्यक्रम यात त्या मुलांचा समावेश, शैक्षणिक सहल व इतर सहलींचा समावेश असतो.
६. संस्थेद्वारे फिरते वाचनालय चालविण्यात येते.
७. संस्थेद्वारे महिलांसाठी बचत गट चालविले जाते यात महिलांचे समूपदेशन करणे, अभ्यासक्रम तयार करणे, प्रशिक्षण देणे, मार्केट उपलब्ध करुन देणे, उदार निर्वाहासाठी व्यवसाय उपलब्ध करुन देणे, इ. चा समावेश असतो.

## संदर्भसूची :


१. भिंताडे, वि. रा.( १९८९) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नूतन प्रकाशन.
२. मुळे रा. शं. व उमाठे, वि. तु.( १९९८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे. विद्या बुक्स औरंगाबाद.
३. पंडित बन्सी बिहारी (२००८). शिक्षणातील संशोधन, नित्य नूतन प्रकाशन पुणे.
४. प्रा. डॉ. दिलीप खैरनार, (२००९). प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
५. जाधव, के. के., (२००८). नवीन काळाचे शिक्षण, अंबे प्रकाशन, नाशिक.
६. काळे प्रेमला, (१९९०). अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई.
७. मुक्ताई बहुउददेशीय सेवा विकास संस्था : माहितीपुस्तिका.

**Websites :**

www.shodhaganga.inflibnet.org.in

www.eric.com

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES • 2012 • SRJIS